महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०५/ २६०२८
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१
दिनांक: १२/०८/२०२५

# परिपत्रक

**विषय: 'हर घर तिरंगा' अभियान साजरे करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ:** १) परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.५/१८६४४ दि.१४.०७.२०२२.
२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण ८२२५/ प्र.क्र.४०७/सां.का.४ दि.४ ऑगस्ट, २०२५.

*****

केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाने जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायम स्वरुपी मनात राहावी व त्याचे संस्मरण व्हावे या उद्देशाने सन २०२२ पासून "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" साजरा करण्याबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या होत्या. या उपक्रमाला अनुसरुन देशभरात "हर घर तिरंगा" हे अभियान राबविण्या संदर्भात देखील सूचना पारित केलेल्या होत्या.

२. उपरोक्त बाब विचारात घेता, केंद्र शासनामार्फत विहित केलेल्या विविध कार्यक्रम/उपक्रमाचे आयोजन करण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण ८२२५/प्र.क्र.४०७/सां.का.४ दि.४ ऑगस्ट, २०२५ अन्वये महाराष्ट्र राज्यामध्ये दि.२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२५ या दरम्यान "हर घर तिरंगा" हे अभियान यशस्वीपणे व प्रभावीपणे साजरे करण्यासाठी सर्व विभाग/कार्यालयांनी पुढाकार घ्यावा याकरिता सविस्तर मार्गदर्शक सूचना पारीत केलेल्या आहेत. दि.०४.०८.२०२५ रोजीच्या शासन पत्राची प्रत सोबत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

३. या अनुषंगाने, महावितरण कंपनीतील सर्व कार्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, शासन पत्र दि.०४.०८.०२०२५ च्या धर्तीवर आपल्या अखत्यारीत येणाऱ्या कार्यालयांमध्ये **'हर घर तिरंगा'** हे अभियान साजरे करण्याबाबतच्या सूचना संबंधितांना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात. तसेच कंपनीतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या घरी देखील **'हर घर तिरंगा'** अभियान साजरे करावे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत:** शासन पत्र दि.०४.०८.२०२५

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण)/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**

मुख्य इमारत, अभिलेख कक्ष, रुम नं. २२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०००३२

**दुरध्वनी क्र. ०२२ - २२०२ ५६०७** Email ID : teacul4.mc-mh@gov.in


**क्रमांक : संकीर्ण ८२२५/प्र.क्र.४०७/सां.का. ४** **दिनांक : ०४ ऑगस्ट, २०२५**

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव, महसुल विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. अपर मुख्य सचिव, जल संपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

४. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

५. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

७. प्रधान सचिव, महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई-

८. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१०. सचिव, पाणी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई.

११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई

१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, एन.एस.आर.एल.एम.

१३. संचालक, एन.यू.एल.एम.

१४. राज्य समन्वयक, एन.एस.एस.

१५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.

१६. विभागीय आयुक्त, सर्व महसूली विभाग

१७. सर्व जिल्हाधिकारी

१८. सर्व आयुक्त, महानगरपालिका

१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

२०. सर्व मुख्याधिकारी

विषय : राज्यात "हर घर तिरंगा" अभियान साजरा करणेबाबत.

संदर्भ : १) केंद्रीय संस्कृती मंत्रालयाचे मा. सचिव यांची दि.३१ जुलै, २०२५ रोजीची ऑनलाईन बैठक.

२) मा. सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग दि.१ ऑगस्ट २०२५ रोजीची ऑनलाईन बैठक.

**महोदय,**

वरील विषयाच्या अनुषंगाने राज्यामध्ये दिनांक ०२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ या दरम्यान "हर घर तिरंगा" अभियाना अंतर्गत विविध कार्यक्रम / उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. संदर्भ क्रमांक ०१ अन्वये केंद्र शासनाच्या संस्कृती कार्य मंत्रालयाचे मा. सचिव यांनी या संदर्भात दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजी ऑनलाइन बैठक घेतली. या बैठकीमध्ये उपरोक्त कालावधीत साजऱ्या करावयाच्या वेगवेगळ्या कार्यक्रम /उपक्रमांबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

०२. "हर घर तिरंगा" अभियानाच्या अनुषंगाने, दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ रोजी मा. सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाइन बैठक आयोजित केली होती. दिनांक ०२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२५ या दरम्यान वेगवेगळ्या विभागांनी/कार्यालयांनी करावयाच्या कार्यवाहीचा तपशील या बैठकीत नमूद करण्यात आला.

०३. "हर घर तिरंगा" अभियान साजरे करण्यासंदर्भात केंद्र शासनाकडून एक सादरीकरणही प्राप्त झाले आहे. उक्त सादरीकरणही आपल्या कार्यालयास ई-मेलद्वारे अग्रेषित करण्यात आलेले आहे. आपणास विनंती करण्यात येते की, या सादरीकरणांमध्ये नमूद केलेल्या सूचना / कार्यक्रम / उपक्रम यावर आपल्या विभागाच्या वतीने योग्य ती कार्यवाही व्हावी."

०४ सन २०२२ पासून महाराष्ट्र राज्याने या अभियानात नेत्रदीपक कामगिरी केलेली असून यावर्षीही, "हर घर तिरंगा" हे अभियान महाराष्ट्रात यशस्वीपणे व प्रभावीपणे साजरे करण्यासाठी सर्व विभाग/कार्यालयांनी पुढाकार घ्यावा. "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले सादरीकरण आपणास अग्रेषित केलेले आहेत, तरीही या अभियानातील महत्त्वाच्या व ठळक गोष्टी खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहेत:-

**कार्यक्रमाचे स्वरूपः**

हर घर तिरंगा अभियान हा कार्यक्रम संपूर्ण देशामध्ये २ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येईल. यामध्ये विविध स्पर्धा / कार्यक्रम / उपक्रम हाती घेणे अपेक्षित आहे.

**तीन प्रमुख टप्पे:**

हर घर तिरंगा अभियानाचे खालील प्रमाणे तीन टप्पे निश्चित करण्यात आलेले आहेत.

**पहिला टप्पा (२ ते ८ ऑगस्ट):**

या कालावधीत जे कार्यक्रम / उपक्रम राबवावयचे आहेत, त्यामध्ये प्रामुख्याने स्वयंसेवकांची नोंदणी, शाळा स्तरावरील जाणीव जागृती, लोकसहभाग व वातावरण तिरंगामय करणे अशा प्रकारचे उपक्रम राबवणे आवश्यक आहेत. त्याशिवाय सोबतच्या सादरीकरणाप्रमाणे सर्व उपक्रम/कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे.

**दुसरा टप्पा (०९ ते १२ ऑगस्ट):-**

या कालावधीत करावयाच्या विविध कार्यवाहीचा तपशील सोबतच्या सादरीकरणांमध्ये नमूद आहे.

**तिसरा टप्पा (१३ ते १५ ऑगस्ट):-**

हा शेवटचा आणि महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्यामध्ये प्रत्येक घरावर राष्ट्रध्वज फडकविणे अभिप्रेत आहे. त्या दृष्टिकोनातून योग्य ती कार्यवाही व्हावी. शासनाच्या सर्व संबंधित विभागांनी/कार्यालयांनी या अभियानामध्ये भाग घ्यावा.

**०५. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-**

१. या अभियानाचा केंद्रबिंदू असलेला असलेला उपक्रम म्हणजे "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या अनुषंगाने शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक घरावर तसेच शासकीय / निमशासकीय सहकारी / खाजगी आस्थापना कार्यालय या ठिकाणी राष्ट्रध्वज फडकवण्यात यावा.

२. आपल्या जिल्ह्यामध्ये आवश्यक राष्ट्रध्वजाची मागणी किती असेल याचा अंदाज घ्यावा व त्यानुसार बचत गट व इतर व्यवसायिकांमार्फत राष्ट्रध्वजाचा पुरेसा पुरवठा होईल हे सुनिश्चित करावे. सोबत अशा काही बचत गटांची यादी जोडलेली आहे. आवश्यक ती मदत हवी असल्यास केंद्र शासनाच्या पॅनेलवरील वेंडरची नावे पुढीलप्रमाणे आहेत. Kasturi Enterprises, Mumbai, (९९२४९ ८४४१०), Elegsa Flags and Garments, Mumbai (Amit Manjrekar ९८२०५ १५५९८) व Suguna creation, Goregaon Mumbai (Chandu (६३५३-९४४२४९). राष्ट्रध्वज निर्मिती व विक्रीमध्ये स्वयंसहाय्यता बचत गटांना विशेष प्राधान्य द्यावे.

३. जिल्ह्यातील प्रमुख शासकीय कार्यालये / महत्त्वाची स्थळे/ पाणीसाठे आणि वारसा स्थळे या ३ ठिकाणी तिरंगा रोषणाई करणे अपेक्षित आहे.

४. विविध प्रकारच्या स्पर्धा जसे की रांगोळी स्पर्धा, राखी निर्माण स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. या स्पर्धा तिरंगा विषयक आशयाशी संबंधित असाव्यात, ज्या ठिकाणी स्पर्धा शक्य नाही त्या ठिकाणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे.

५. सर्व शासकीय संकेतस्थळांवर "हर घर तिरंगा" विषयक मजकूर आणि संबंधित लोगो असावेत.

६. यावर्षी "हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता : स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग" या घोषवाक्यासह "हर घर तिरंगा" अभियान साजरे करावयाचे आहे. त्यामुळे या संदर्भाने स्वच्छ पाणी व

परिसर स्वच्छता या मोहिमा हाती घेणे आवश्यक आहे. या उपक्रमाचे महत्त्व लक्षात घेता प्रत्येक शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये या उपक्रमाची माहिती देण्यात यावी.

७. १५ ऑगस्ट रोजी अमृत सरोवर आणि सार्वजनिक स्थळे अशा ठिकाणीही राष्ट्रध्वज फडकण्यात यावा.

८. या अभियानामधील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे अभियानाची माहिती सर्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वयंसेवकांनी पुढे यावे, यासाठी स्वयंसेवकांनी हर घर तिरंगा या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे. याकरिता, एन.एस.एस., महाविद्यालयीन विद्यार्थी व इतरांना स्वयंसेवक म्हणून नोंदणी करता येईल.

९. या "हर घर तिरंगा" अभियानाच्या अनुषंगाने "तिरंगा मेला" याचेही आयोजन करण्याबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. ज्याप्रमाणे "सरस" प्रदर्शनाचे आयोजन होत असते. त्याच धर्तीवर आयोजन व्हावे.

१०. "हर घर तिरंगा" अभियानाअंतर्गत जे कार्यक्रम / उपक्रम साजरे होत आहेत, त्याची कार्यक्रम पूर्व व पश्चात प्रचार-प्रसिद्धी करावी. त्यासाठी जिल्हा माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

११. तिरंगासह सेल्फी सारख्या उपक्रमांवर विशेष लक्ष देऊन नागरीकांनी आपल्या सेल्फी

संकेतस्थळावर अपलोड करणेही महत्वाचे आहे.

१२. या कार्यक्रमांची छायाचित्रे राज्य समन्वयकाकडे पाठवणे, आपल्या स्तरावरून, छायाचित्र अपलोड करणे या बाबीही या अभियानात महत्त्वाच्या आहेत.

१३. अभियान संपन्न झाल्यानंतर त्याविषयीचा अहवाल सादर करणे ही आवश्यक आहे.

१४. "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून आतापर्यंत आलेल्या सूचना आपणापर्यंत अग्रेषित करण्यात आलेल्या आहेत. यापुढेही वेळोवेळी ज्या सूचना प्राप्त होतील त्या आपणापर्यंत अग्रेषित करण्यात येतील. तोपर्यंत या सूचनांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही सुरू करण्यात यावी.

१५. या अभियानासाठी शासनाकडून कोणताही निधी उपलब्ध करून देण्यात येणार नसून, प्रत्येक विभागांनी / कार्यालयांनी आपापल्या आर्थिक तरतुदी मधून सदर अभियान साजरे करावयाचे आहे.

१६. "हर घर तिरंगा" अभियानासंदर्भात एक केंद्री संपर्कासाठी सांस्कृतिक कार्य संचालनाच्या स्तरावर एक कक्ष निर्माण केलेला आहे. श्री संदीप बलखंडे, सहाय्यक संचालक, भ्रमणध्वनी क्र. ९७६३० ६८०८३ यांची या कक्षाच्या प्रमुख पदी नियुक्त करण्यात आलेली आहे. या अभियाना दरम्यान काही समस्या/प्रश्न उद्भवल्यास कृपया सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या या कक्षाशी संपर्क साधावा.

१७. अधिक माहितीसाठी/ स्वयंसेवक नोंदणीसाठी / सेल्फी अपलोड करण्यासाठी व तपशीलवार माहितीसाठी https://harghartiranga.com या संकेतस्थळाला कृपया भेट द्यावी.

उपरोक्तप्रमाणे काही ठळक सूचना अग्रेषित करण्यात येत आहेत. याशिवाय केंद्र शासनाकडून प्राप्त सादरीकरणामध्ये तपशीलवार सूचना दिलेल्या आहेत. सदर सूचनांप्रमाणे योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(दिलीप सोळसे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत: केंद्र शासनाकडील सादरीकरण.

प्रत:

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री, नियोजन व वित्त, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व उपसचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व अवर सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व कक्ष अधिकारी, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती सां.का ४.